# गुन्हे प्रतिबंधक योजना

अकोला जिल्हयांत गंभिर गुन्हयांना आळा घालण्याकरीता पो.स्टे.निहाय लावण्यांत आलेली रात्रगस्त हि प्रभावीप राबविण्यांत येत नसल्याचे आमचे निदर्शनास आले आहे. त्यान्वये रात्रगस्तीत वाढ करुन ती प्रभावीपणे व परिणामकारक राबविणे नितांत गरजेचे व अत्यावश्यक झाले आहे.

तसेच अकोला जिल्हयांत मालमत्तेविरुध्दचे गुन्हयांत मोठया प्रमाणांत वाढ झालेली असुन मालमत्तेच्या गुन्हयांवर परिणामकारक प्रतिबंध होण्यासाठी जिल्हयांतील सर्व अधिकारी व पोलीस अंमलदारांनी खालील सुचनांची काटकोरपणे अंमलबजावणी करावी.

१.पो.स्टे.ला कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्या बरोबरच गुन्हे होवु नये म्हणुन पो.स्टे.परिसरात प्रभावी व परिणामकारक नाकाबंदी लावुन गुन्हा घडल्याबरोबर पो.स्टे.च्या डि.बी.स्कॉड च्या कर्मचां-यांना तसेच गुन्हेगारांची गुन्हे पध्दत ओळखत असलेल्या व गुन्हेगारांची माहिती असलेल्या कर्मचा-यांना गुन्हयाच्या ठिकाणी तपासा करीता तात्काळ पाठवावे.

२.पो.स्टे.हद्यीत रात्रगस्त प्रभावीपणे व परिणामकारक राबविणे नितांत गरजेचे व आवश्यक आहे. त्यान्वये रात्रगस्त प्रभावीपणे राबवितांना सर्व पो.स्टे.च्या हद्यीत रात्री २३.०० नंतर उशिरापर्यत हॅाटेल्स,बिअर/वाईन बार,पानठेले सुरु राहणार नाहीत ते रात्री २३.०० वाजता बंद करण्याची कारवाई करावी.

३.रात्रगस्त करण्याकरीता अधिकारी व कर्मचारी यांनी रात्री २३.०० वाजता रवाना झालेच पाहीजे. पो.स्टे.चे रागस्त चेकींग अधिकारी यांनी पो.स्टे.चे अधिकारी व कर्मचारी हे २३.०० वा.रवा-ना झालेबाबतची माहिती नियंत्रण कक्षास वायरलेस वरुन देणे आवश्यक आहे. तसेच सदर माहितीची नोंद पो.स्टे.च्या स्टे.डा.मध्ये घ्यावी.

४.रात्रगस्त दरम्यान रात्रीला कुणीही व्यक्ती व अनोळखी इसम विनाकारण रस्त्यावर फिरणार नाही याची दक्षता घ्यावी. अनोळखी इसम विनाकारण रस्त्यावर वा इतर ठिकाणी फिरतांना दिसुन आल्यास त्याची चौकशी करणे अत्यावश्यक आहे.

५.स्था.गु.शा.अकोला यांनी गुन्हयामध्ये जे आरोपी उघड केले आहेत अशा आरोपींची यादी तयार करुन पो.स्टे.ला पाठवावी.

६.पो.स्टे.अधिकारी यांनी त्यांचे हद्यातील निगराणी बदमाश , नोन-क्रिमीनल व सक्रिय गुन्हेगारांची यादी रात्रगस्त कर्मचा-याला दयावी.

७.बीट मार्शल यांनी आपआपल्या बिट परिसरात सतर्क व प्रभावी पेट्रोलींग करुन पेट्रोलींगबाबची माहिती वेळोवेळी नियंत्रण कक्षाला दयावी.

८.प्रत्येक बिट मार्शल हद्यीत किमान १५ ठिकाणी गस्त नोंद पुस्तीका ठेवण्यांत याव्यात. सदर पुस्तीकेमध्ये रात्री २३.०० वा.रात्रगस्त सुरु झाल्यानंतर २३.०० वा.ते ०१.३० वा.पर्यंत बिट मार्शल यांनी चेक केल्याबाबत स्वाक्षरी करावी.त्यानंतर ०१.३० वा.ते ०३.३० वा.पर्यंत पिट मोबाईल यांनी चेक करुन गस्त नोंद पुस्तीकामध्ये नोंद करतील. ०३.३० वा.नंतर पुन्हा बिट मार्शल यांनी ा नोद पुस्तीकांमध्ये स्वाक्षरी करावी.

९.सेक्टर पेट्रोलींग मधिल अधिकारी यांनी सेक्टर मधिल किमान १५ बिटला व पो.स्टे.ला भेट देणे आवश्यक आहे. भेट दिल्या-नंतर त्याबाबत गस्त पुस्तीकेमध्ये स्वाक्षरी करावी.

१०.पो.स्टे.अधिकारी यांनी त्यांचे पो.स्टे.परिसरातील गुन्हे प्रवण क्षेत्रात तसेच बॅका,व्यापारी संकुले,सराफा परिसर,बॅकांचे परिसर,पेटोल पंप, व इतर औद्योगीक ठिकाणी,प्रार्थना स्थळे,विविध बॅकेंची एटीएम मधिनचे ठिकाणे, बाहेर वॉचमन असलेल्या इमारतीचे ठिकाणी गस्त पुस्तीका ठेवाव्यात.त्याच प्रमाणे पोलीस कर्मचारी यांनी जास्तीत जास्त क्षेत्रात गस्त करून त्यामध्ये गस्त नोंद पुस्तीकांवर स्वाक्षरी करण्याकरीता जावे लागेल अशा ठिकाणी गस्त नोंद पुस्तीका ठेवणे आवश्यक आहे.

११.पो.स्टे.अधिकारी यांनी दररोज सकाळी बिट पंस्तक व समन्स वारंट तामील बाबत त्यांनी केलेली कारवाइ इत्यादी तपासुन आढावा घ्यावा

१२. उप विभागीय पोलीस अधिकारी / पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. यांनी आठवडयातुन किमान दोन पोलीस स्टेशनला भेट देवून पो. स्टे. चे रेकॉर्ड चेक करावे . त्याच प्रमाणे पोलीस अधीक्षक /अपर पोलीस अधीक्षक यांनी किमान दोन पोलीस ठाणे चेक करावे. पोलीस ठाण्याच्या हद्यीत मोठी घरफोडी झाल्यास तेथील बिट अधिकारी व सेक्टर मोबाईल मध्ये कर्तव्यावर असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अनुशासनात्म कारवाई करण्यात येईल अशा स्पष्ट सुचना सर्व ठाणेदार यांनी आपले पोस्टे च्या दररोजच्या सकाळ व संध्याकाळच्या गणणेवर दयाव्यात.

१३.पोलीस ठाण्याचे निगराणी बदमाश रजिष्टर, सर्वेलन्स रजिस्टर अदयावत करून ठेवावे. प्रत्येक रात्रगस्त दरम्यान किमान ५ निगराणी बदमाशांना चेक करून त्या बाबतची माहिती हिस्टीसिट ला व सर्वेलन्स रजिष्टरला घेवून चेक केल्या बाबतची माहिती नियंत्रण कक्षाला दयावी. पो.स्टे.अधिकारी यांनी त्यांचे पो.स्टे.हद्यीत सक्रीय असलेल्या गुन्हेगाराचे हिस्टीसीट तयार करावे. सदर हिस्टीसिट मध्ये गुन्हेगाराचे फोटो व फिंगरस्लिप लावणे आवश्यक आहे.

१४.पोलीस ठाण्याचे हद्यीत असलेल्या सिनेमागृहातील सिनेमा पाहुन मध्यरात्रीला येणा—या व्यक्तींवर तो कोठे जातो कोठे फिरतो यावर बारकाईने लक्ष दयावे.

१५.मध्यरात्री नंतर एखादा इसम पो.स्टे.हद्यीत फिरतांना मिळुन आल्यास व त्याने समाधानकारक उत्तर न दिल्यास अशा इसमा विरूध्द १२२ मु.पो का. प्रमाणे कारवाई करावी.

१६.पो.स्टे. हद्यीत चोरी,घरफोडी होवू नये म्हणून बिट मार्शलनी प्रभावी गस्त करावी. व जे घरे बंद आहेत त्यावर गस्त दरम्यान विशेष लक्ष दयावे. ज्या व्यक्ती घरे बंद करून बाहेरगांवी जातात अशांनी पो.स्टे.ला माहिती दयावी जेणे करून अशा बंद घरावर विशेष लक्ष देता येईल.

१७.सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांनी आपले पो.स्टे. हद्यीत घडलेल्या मालमत्ते विरूध्दच्या गुन्हे आलेख तयार करून त्यामध्ये आढळुन आलेल्या गुन्हे प्रवण क्षेत्रात प्रभावी गस्त लावावी.

१८.ज्या पो.स्टे.च्या हद्यीत सकाळी गुन्हे घडतात जसे महिलांच्या गळयांतील सोन्याचे दागीने तसेच मंगळसुत्र हिसकावुन पळुन जाणे अशा गुन्हयांना प्रतिबंध घालण्याकरीता अशा पो.स्टे.चे ३ ते ४ पोलीस कर्मचारी सोबत घेवुन महिला कर्मचारी यांचे मदतीने स्था.गु.शा यांनी सापळा रचुन असे गुन्हे करणारे गुन्हेगारांना पकडण्याची कारवाई करावी. सदर गुन्हयास प्रतिबंध घालण्याकरीता सापळा लावतांना तो सकाळी ०५.३० ते ०८.०० वा.पर्यंत लावण्यांत यावा. व आवश्यकतेनुसार कारवाई करावी. हि कारवाई सर्व पो.स्टे.च्या प्रभारी अधिकारी यांनी आपल्या हद्यीत स्वत: करून घ्यावी.

१९.नाकाबंदीच्या वेळेस मोटार सायकलींच्या कागदपत्रांची तपासणी करतांना चोरीस गेलेल्या वाहनांचा चेसीस नंबर व इंजिन नंबरचे लिस्टची माहिती सोबत ठेवुन ते सुध्दा चेक करावे. रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड,चित्रपट गृहे येथील मोटार सायकल स्टॅन्डवर ठेवण्यांत आलेल्या मोटार सायकलचे चेसीस नंबर व इंजिन नंबर सुध्दा चेक करावे जेणे करून चोरीस गेलेल्या वाहनांचा शोध मिळु शकेल.

२०.कोणत्याही पो.स्टे.च्या हद्दीत कोणताही गुन्हा घडल्यास त्या पो.स्टे.च्या प्रभारी अधिकारी यांनी डी.बी.स्कॉड चे अधिकारी व कर्मचारी यांना गुन्हेगारांच्या संभाव्य लपण्याच्या ठिकाणी उदा.पडकी घरे, इमारती, मंदीर,प्रार्थनास्थळे, ओसाड जागी आरोपी शोधकामी तात्काळ रवाना सदर ठिकाणची तपासणी करणेस सांगावे. अशा घडलेल्या गुन्हयांची माहिती मिळताच ५ मिनीटांचे आंत नाकाबंदी,पेट्रोलींग व चेकींगला सुरू करावी.

२१.शहरात कोणत्याही ठिकाणी दरोडा वा जबरी चोरी सारखे गंभिर गुन्हे घडल्यास ज्या पो.स्टे.हद्दीत सदरचा गुन्हा घडला त्या पो.स्टे.चे अधिकारी यांनी तसेच सदर पो.स्टे.च्या लगत असलेल्या सर्व पो.स्टे.अधिकारी यांनी त्वरीत शहराबाहेर जाणा—या रोडवर नाकाबंदी लावावी. नाकाबंदी लावतांना शहरातील मुख्य चौकात नाकाबंदी लावणे आवश्यक आहे. आरोपीचे वर्णन दिले असेल तर त्या प्रमाणे सदर आरोपींचा शोध घेतला पाहीजे. या करीता पो. स्टे.ला ७ ते ८ कर्मचारी सतत राखीव ठेवावे. वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी या करीता वारंवार बिनतारी संदेशावर

सुचना देण्याची गरज पडता कामा नये. सर्व पोलीस अधिकारी व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांनी ऐकमेकांचे कायम संपर्कात रहावे.बिनतारी संदेशावर किमान दुस—या कॉलवर उत्तर देणे अत्यावश्यक आहे. पो.नि. स्था.गु.शा.यांनी नाकाबंदी कारवाईचे समन्वय तात्काळ व स्वतः करावे.

२२.सर्व पो.स्टे. अधिकारी यांनी त्यांचे हद्दीत महत्वाचे नाकाबंदीचे ठिकाणी बॅरिकेटींग/ड्रम लावून तेथे कर्मचारी वॉकीटॉकीसह नेमावेत तसेच सदर ठिकाणी प्रभावी वाहन चेकींग करावी व संशयीत वाहनाची झडती घ्यावी.

२२.पो.स्टे.प्रभारी अधिकारी यांनी रात्रगस्त मधील कर्मचारी यांनी सोबत काठी,व्हिसल,टॉर्च,रेनकोट ठेवण्याबाबतच्या सुचना दयाव्यात.तसेच रात्रगस्त करतांना पोलीस कर्मचा—यांनी शिटी वाजविणे आवश्यक आहे. त्यामुळे किमान चोरीचे गुन्हयांना प्रतिबंध होवु शकतो.

२३.जो परिसर गुन्हे प्रवण क्षेत्रात येतो अशा परिसरात ठाणेदार यांनी सतत पेट्रोलींग ठेवावी.

२४.रात्रगस्तीच्या वेळेस रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड,खाजगी बस वाहनतळांवर सकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत अनोळखी व संशयीत इसमांना चेक करावेत जेणेकररून गुन्हेगार मिळण्यास मदत होईल.

२५.प्रत्येक पो.स्टे.प्रभारी अधिकारी यांनी आपआपल्या पो.स्टे.हद्दीत चौकीदार,गुरखे यांची आठवडयातुन किमान एक बैठक घेवुन त्यांचे संपर्क क्रमांक नोंद करून ठेवावे. तसेच ठाणेदारांनी स्वतःचा मोबाईल क्रमांक व दुरध्वनी क्रमांक पो.स्टे.चा दुरध्वनी क्रमांक त्यांना दयावा. त्यामुळे जर एखादा अनुचित प्रकार घडल्यास त्यांचेकडुन पो.स्टे.ला ताबडतोब घटनेची माहिती मिळण्यास मदत होईल.

२६.ज्या भागांत चोरी,घरफोडी चे गुन्हे घडतात अशा भागातील लोकांसोबत संवाद साधुन सदर लोकाना व त्या परिसरातील तरूणांना रात्रगस्त करीता प्रोत्साहीत करावे. त्यांचे दोन लोक असल्यास त्यांचे सोबत एक पोलीस कर्मचारी रात्रगस्तीला मदतीला दयावा.

२७.ज्या भागात घरफोडी किंवा चोरी घडली अशा घटनास्थळाचें ठिकाणी रात्री २३.०० वा.नंतर कोण लोक बसले होते किंवा कोण लोक घर न्याहाळुन गेले अशा इसमांची माहिती काढण्यांत यावी जेणे करून गुन्हेगार मिळु शकण्यास मदत होईल.

२८.रात्रगस्त मधील कर्मचारी यांनी आपले स्वत:चे पॅट्रोलबुक सोबत ठेवुन रात्रगस्तवेळी त्यावर पो.स्टे.निहाय नेमण्यांत आलेले चेंकींग अधिकारी तसेच उप विभाग निहाय नेमण्यांत आलेले जनरल चेकींग अधिकारी यांची चेकींगचे दरम्यान स्वाक्षरी घ्यावी.

२९.रात्रगस्त दरम्यान प्रत्येक पॉईन्टवर १ कर्मचारी ठेवावा. उर्वरीत २ कर्मचारी हे गस्त परिक्षेत्रात गस्त करतील. गस्त करून परत आल्यानंतर गस्त मधील १ कर्मचारी पॉईन्टवर ठेवून पॉईन्टवरील दुसरा कर्मचारी सोबत घेऊन पुन्हा २ कर्मचारी यांनी गस्तपेट्रोलींग करावी या प्रमाणे राउंड ओ क्लॉक पध्दीतीने आळीपाळीने कर्मचारी यांनी त्यांना नेमुण दिलेल्या परिसरात गस्त करावी व कोणत्याही स्थितीत पॉईन्टवर १ कर्मचारी हजर राहील या पध्दती प्रमाणे रात्रगस्त करावी. पेट्रोलींगला जातेवेळी व परत येतेवेळी आपले गस्त परिक्षेत्रात ठेवलेल्या गस्त पुस्तीके मध्ये वेळेसह व घडलेल्या घटनेबाबत नोंदी घ्याव्यात.

३०.पो.स्टे.च्या परिसरात गस्तकरीता लावण्यांत आलेल्या पोलीस कर्मचारी यांना देण्यांत आलेले आर्म ,ॲम्युनेशन, आर्मचा बट क्रमांक,त्यांना त्यांचे डयुटी ठिकाणी किती वाजता रवाना करण्यांत आले इत्यादी बाबतची माहिती लगेच नियंत्रण कक्ष,अकोला येथे दयावी व तसेच सदर प्रकरची नोंद स्टे.डा.घेण्यांत यावी.